निलेश देसाई

# शापित राजपुत्र



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# शापित राजपुत्र

(प्रेमकथा)

लेखक : निलेश देसाई

# शापित राजपुत्र

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शापित राजपुत्र

लेखक : निलेश देसाई

पत्ता : २०५/बी, ओंकारेश्वर अपार्टमेंट, वडवली, अपोझिट रायगड बील्ड.

अंबरनाथ (पू). ठाणे – ४२१५०१

मोबाईल नंबर:- 9833471147

संकेतस्थळ : marathistories.online

ई-मेल : desai.nilesh199@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २१ जुलै २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.


- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**'डॉमिनंट'**

**लेखक निलेश देसाई**

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dominent_nilesh_desai.pdf

'डॉमिनंट' ही कांदबरी वाचली. आनंद सुद्धा झाला.आणि एखाद्या श्रील्लर चित्रपटापेक्षाही कील्लर चित्रपट शब्दातुन डोळयासमोर ठेवल्याबद्दल तुमचे खरंच अभिनंदन!
आणि येथील हिंदीतील शब्द रेखांटन अप्रतीम वाटतं
तुमच्या नवीन लेखनास शुभेच्छा! तुमच्या पुढील पुस्तकाच्या प्रतिक्षेत्.......!
आकाश नागपुरे




नमस्कार निलेश..!

मित्रा तुझी “डॉमिनंट” कादंबरी वाचली. अतिशय सडेतोड अन उत्तम लिखाण आहे तुझे. प्रत्येक प्रसंग वाचताना डोळयापुढे त्याचं काल्पनिक चित्र आपोआप तयार होतं आणि वाचण्याची मजा अजून वाढते. सुरुवातीला इतर पात्रे डॉमिनंट वाटली पण सरते शेवटी मनू सर्वांवर भारी पडली आणि खऱ्या अर्थाने तीच डॉमिनंट निघाली. ई साहित्यचे आभार अन तुझ्या पुढच्या पुस्तकासाठी खूप खूप शुभेच्छा.

धन्यवाद.

सचिन कुंभार

Greetings!
Dominent Book is a awesome book of suspence and thrilling. I have read it. and best of luck for your next turn.

Thank you,
Ashwini.Lomate

नमस्कार ई साहित्य प्रतिष्ठान,

मी आपल्या वेबसाईटवरील, श्री. निलेश देसाई यांचे डॉमीनंट हे पुस्तक वाचले.
खूपच छान असे पुस्तक आहे हे. रोमांचकारी, ऍक्शनने भरपूर असलेले हे पुस्तक गुप्तहेरांच्या गोष्टींमधले एक वेगळे पुस्तक म्हणून शकतो.
मी लेखकांनाही मेल करून प्रतिसाद कळवलेला आहे.
आपण नवीन लेखकांना हा मंच उपलब्ध करून दिल्याने खूप लेखक लिहिण्यास प्रोत्साहित होतील आणि वाचकांनाही खूप साहित्य वाचावयास मिळेल.
धन्यवाद,

प्रथमेश सागवेकर,
पुणे

मनोगत



सर्वप्रथम ई साहीत्यच्या टिमचे आणि वाचकांचे मनःपूर्वक आभार. ‘डॉमिनंट’ला मिळालेला प्रतिसाद खरंतर अनपेक्षित होता. कथा बऱ्यापैकी वाचकांना आवडेल याची खात्री होती, तरीही वाचकांनी केलेलं कौतुक सुखावह होतं. ‘डॉमिनंट’ साठी ई-मेल्स, मॅसेजेस, कॉल करणाऱ्या त्या वाचकांमध्ये गावखेड्यापासून ते अगदी परदेशातील वाचकवर्ग होता याचे काहीसे आश्चर्य वाटले. मला वाटते हे ई-साहीत्यचे यश आहे त्याबद्दल त्यांचे मनापासून धन्यवाद.

*‘शापित राजपूत्र’ खरंतर डॉमिनंटच्या आधी लिहली गेली होती.* दहावीत असतानाच अर्धी कथा सुचलेली. जसजशी वर्षे सरू लागली, त्यासोबत आपोआपच कथा मनात पूर्ण होऊ लागली. *सगळ्याच प्रेमकथा पूर्णत्वास जात नाहीत पण हे देखील तितकंच खरं आहे की शेवटपर्यंत मानवी मन आशा सोडत नाही. एखादी गोष्ट हवीहवीशी वाटत असतानाही तिचा त्याग करावा लागतो. प्रयत्नांती परमेश्वर जरी म्हटलं तरी नियती असा खेळ खेळते की प्रयत्न करण्याबाबतही संभ्रम व्हावा. ‘शापित राजपूत्र’ या कथेतला नायक आपल्याला कदाचित तुमच्या आमच्यातलाच एक वाटेल. कथेतला नायक आपल्याला आपल्या पहिल्या प्रेमाची आठवण नक्की देऊन जाईल.* मनाला अत्यंत जवळची असलेली ही कथा आशा आहे आपल्याला *आवडेल.*

------- निलेश देसाई

जन्म तारीख : १९-०९-१९८८

**अर्पण पत्रिका**

आपल्या जीवनातील अमूल्य वेळ खर्च करून

मला प्रतिसाद देणाऱ्या

माझ्या ब्लॉग आणि ई-साहीत्यच्या

सर्व वाचकमित्रांना अर्पित.

# अनुक्रम

नीरव…

शाळेतलं पहिलं प्रेम

‘प्रेम’ कि ‘मैत्री’?

प्रेम फक्त एकदाच होतं का..?

स्थितप्रज्ञ

शेवटच्या वळणावर…

शेवट…

# नीरव...

'बेबी ब्रींग ईट ऑन......' वरातीत डिजेवाल्यानं चालू केलं आणि इतका वेळ वाजणाऱ्या हिंदी गाण्यांनी त्रासलेला तो... कुठल्याश्या कोपऱ्यातून सुसाट बाहेर येऊन नाचणाऱ्या ग्रुपमध्ये सामील झाला. बेफान होऊन नाचत तो पाहतही नव्हता की कोणाला त्याची लाथ लागतेय की कोणी त्याच्या आसपास नाचत आहे.

आपल्याच धुंदीत उत्स्फूर्त होऊन डक डान्स, बेले डान्स, नागिण डान्स, रस्त्यावर होऊ शकणाऱ्या हरएक प्रकारच्या डान्सचा जलवा तो दाखवत होता. एकएक करून इतरजण आपलं थांबवून यालाच पाहू लागले. आणि हा आपल्याच तालात सुरू होता.

प्रसंग काय, आपण करतोय काय... देहभान विसरलेले... डोक्यात चढलेली दारू, कानावर पडणारा डीजेचा आवाज.. मदमस्त मेंदूत उठणारी तरंगे.. आणि त्याच धुंदीत तालावर थरथरणारं त्याच शरीर... सुन्न होत गेलेल्या भावना... तुटलेलं ह्रदय.. झुरलेले मन.. सगळं जे आजपर्यंत मनात कुठंतरी दाबून ठेवलेलं तेच आता उफाळून बाहेर येत होतं.

नीरव... अनुभवलात तर या कथेचा नायक नाहीतर एक पात्रच.. पंचवीशीतला.. दिसायला गोरापान, हलकेसे कुरळे केस.. हाईट बॉडी साधारणं.. उगाचची फॅशन न करता चार

लोकांत जेंटलमॅन दिसेल अशी कडक इस्त्री अन् बाहेर जाताना नेहमी ईन-शर्ट असलेली वेशभूषा.. अगदी निरखून पाहणाऱ्यालाही आपल्यातल्या सभ्यतेवर बोट ठेवायची संधी नीरव कोणाला द्यायचा नाही.

चारचौघात असताना आपल्या शांत संयमी स्वभावाने समोरच्यांची मन जिंकणारा. आजूबाजूच्या बऱ्याचशा विषयांवर बारीक लक्ष ठेवणारा. अवांतर वाचन करणारा. या सवयींमुळेच आवश्यक ती माहीती संग्रहीत करून वेळप्रसंगी इतरांसमोर ती मांडणारा. उत्तम वक्तृत्व, हजरजबाबी, फावल्या वेळात लिखाण करणे, चारोळ्या तर अगदी ओठांवरून वाहात असल्यासारखे करायचा.

असे अनेक छंद त्याने जोपासले होते. पण हे सर्व गुण गरज असेल तिथेच आणि आवश्यक तितक्याच माणसांसमोर तो दाखवायचा. नविन व्यक्तींसाठी मितभाषी असणारा तो क्वचितच स्वतःला व्यक्त करायचा.

पण आज अचानक त्याचे काय बिनसले. आधीच कधी नाही ती दारू ढोसलेली.. त्यामुळे त्याचे त्यालाच भान नव्हते. बाकीची सर्व मित्रमंडळी याचं पहिल्यांदाच असलं रूप पाहत होती. कोणाच्या कल्पनेतसुद्धा असं वागू न शकणारा नीरव.. सर्वांच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव होते. फक्त दोन व्यक्ती सोडून. एक अमेय... समोरच उभा होता. अन् दुसरा सागर.. नवरदेव.

आपल्या मित्राला जाऊन थांबवावे असे अमेयच्या मनात आले. पण नीरवचा हा अवतार पाहुन त्यालाही वाटले येऊ दे सर्व बाहेर. तेवढंच नीरवचं झुरणारं मन शांत होईल. आपला मित्र आतून किती तुटलाय हे प्रत्यक्ष आज अमेयला दिसत होतं. दुसऱ्या बाजूला सागरही शांतपणे सर्वकाही पाहत होता. पण जाऊन ते थांबवावं इतकं धाडस त्याच्यात नव्हतं.

आणि नियतीपुढे हतबल झालेला नीरव तुफान नाचत होता.. स्टॅमिना संपत आलेला.. श्वास भरलेला.. थकलेलं शरीर.. आणि लागलेली धाप... नाचत नाचतच आयुष्य संपावं असं मनोमन नीरवला वाटलं...

नीरव थंड पडू लागला तसं इतरांनी पुन्हा काही झालेच नाही अश्या आविर्भावात नाचायला सुरूवात केली. अमेयने धावत पुढे जाऊन नीरवला सावरले. त्याला घेऊन जवळच असलेल्या आपल्या घरी आला. नीरवला घरी झोपवून अमेय पुन्हा लग्नमंडपात आला. सागरच्या लग्नाची सर्व जबाबदारी अर्थातच अमेय आणि नीरव वर होती. म्हणूनच नीरव इथे अश्या अवस्थेत असतानाही अमेयला नाईलाजाने त्याला सोडून जावे लागले.

नीरव अर्धवट शुद्धीतच होता. डोळे बंद झाले.. पण तो जागाच होता.. हलकेसे काही आठवत....

अलगद डोळयांच्या पापण्याची उघडझाप झाली त्याच्या... पडल्या जागेवरूनच खिडकीच्या बाहेरचा चंद्र दिसला. गर्द काळया अंधाराला तेवढाच त्या चंद्रकलेचा आधार होता.

नीरव शुद्धीवर येऊ लागला. तरीही उठून बसण्याची तसदी न घेता तो तसाच पडून राहीला.. खिडकीबाहेरच्या चंद्राचा गोळा हळूहळू मोठा होऊ लागला… नीरवला त्यात सर्व भूतकाळ आठवू लागला.. खरा नीरव.. मैत्री.. प्रेम.. हार.. सगळं काही..

‘पण हे नियतिच्या मनात नव्हतंच. तो शापित नव्हताच.. अहं.. इतर सगळया बाबींत असेलही तो कमनशिबी. पण प्रेम.. ते तर मिळाल्यात जमा होतं. तरीही हातातोंडाशी आलेला घास निघून गेला. पण यावेळी नशिब नाही तो स्वतःच जबाबदार होता.. का नियतीनेच हे सर्व त्याच्याकडून घडवून आणले होते?’

भूतकाळाची सुरूवात अगदी पूर्वीपासून झाली.. अन् नीरवच्या डोळयांच्या कडा पाणावत अश्रू घरंगळत उशीवर पसरू लागले..

# शाळेतलं पहिलं प्रेम

अमेयच्या घरी अर्धवट शुद्धीत झोपलेल्या नीरवला भूतकाळात डोकावताना सर्वप्रथम शाळा आठवली. दहावीचं वर्ष संपायला अजून चार महीने बाकी होते.

“नीरव, तू डान्समध्ये भाग घेतला आहेस ना..? पार्टनर भेटली का..? अजून शोधली नाहीस तर मेघना आहे.. ती शोभून दिसेल तुला.” गीता वर्गाच्या बाहेर उभी राहून नीरवला हलक्या आवाजात सांगत होती.

आतमध्ये सर शिकवत होते, पण नीरव आणि गीता फळयावर नाव आल्याची शिक्षा म्हणून वर्गाबाहेर होते.

“नाही, मी फक्त नाव दिलेय पण अजून बाकी गोष्टी नक्की नाहीत.. म्हणजे मी कोणाला विचारले नाही तसे. मेघना तयार होईल का पण..? तिला आवडते का शाळेतल्या फंक्शन मध्ये डान्स करायला..? नीरव.

किंचीतसे हसत गीता बोलू लागली.. “अरे मेघना एका पायावर तयार होईल..”

“असं का..! अगं पण एका पायावर डान्स करायची काय गरज आहे.. दोन्ही पायांचा उपयोग व्हायला हवा की..” मिश्किलपणे हसत नीरव म्हणाला.

“जोक मारू नकोस उगीच, तशी सांगायची पध्दत असते. आणि तिनेच मला तुझ्याशी बोलायला सांगितले.” लटक्या रागात गीता.

“काय डान्ससाठी यायचं आहे म्हणून तिला..?” नीरव.

“हो, पण फक्त तेवढंच नाही रे.. नीरव, तू तिला नाही समजून घेतलंस कधी.. ती केव्हाचीच प्रेमात पडलेय तुझ्या. तुला नाही कळत का ती समोर येते तेव्हा. कधी जाणणार तू हे. आणि त्यात ती विचारायचंही धाडस नाही करत.” गीताने मुळ मुद्दाच सादर केला.

“काय बोलतेस... पण मला या सगळयाची काहीच कल्पना नव्हती.. अगं ती एवढी चांगली मैत्रीण माझी. कधीच कशी नाही बोलली याबद्दल.” नीरव थोडासा गोंधळतच म्हणाला.

“मुली कधी प्रपोज करतात का रे मंद.. तुला नको का कळायला तिच्या मनातलं.” गीता.

“ठीक आहे मी बोलतो तिच्याशी.” मनात फूटलेला लाडू गीतासमोर न दाखवता नीरव आवंढा गिळत म्हणाला.

“बरं मग लवकर उत्तर सांग मला, तिला कळवावं लागेल.” गीता वर्गातून जाणाऱ्या सरांकडे पाहत हळूच नीरवला म्हणाली.

“अगं मी प्रत्यक्ष भेटून सांगतोच की तिला..” नीरव अजूनही स्वतःमध्येच हरवला होता.

“ठिकेय.. मी सांगायचे काम केलं बाकी तुम्ही पाहून घ्या..” गीता.

वर्गात आल्याआल्याच नीरवनं तिच्याकडे तिरक्या नजरेचा कटाक्ष टाकला. इकडे गीताने अगोदरच तिला डोळा मारून खुणावले होते. नीरवशी नजरानजर होताच लाजून मेघनानं पुस्तकात मान खुपसली. तिला पाहत पाहतच नीरव त्याच्या जागेवर जाऊन बसला. हुश्श.. आता जरा हायसे वाटले त्याला.

गीताचे शब्द पुन्हा आठवू लागले. गालावर नकळत खळी उमटू लागली. अलगद मोरपिसं अंगावरून फिरू लागली अन् त्या मोरपीसांच्या स्पर्शाने रोम रोम बहरू लागले. त्या क्षणाला नीरव हर्षावला.

‘कुणीतरी आपल्या प्रेमात आहे आणि मी मूर्ख एवढंही समजू शकत नाही. पण कसे अन् कधी झालं असेल. झाले तेव्हा झाले आता तर आपल्याला कळाले, हे ही नसे थोडके..? पुन्हा त्याची नजर मेघना कडे गेली. त्याच्याकडेच पाहत होती ती..

यावेळी पुस्तकात डोकं खुपसायची वेळ नीरवची होती. तोही तसा लाजाळूचं होता.

शाळा सुटून घरी आला तरी नीरवच्या मनातले प्रेमतरंग तसेच बागडत होते. मान्य आहे की अगोदर असलं काही मनात आलंच नव्हतं त्याच्या. पण समोरून आलेला मुलीचा प्रपोज आणि त्यातून मिळणारा अलौकिक आनंद सोळाव्या वर्षातल्या कोवळ्या मनासाठी वेगळाच असतो.

त्यात मेघना म्हणजे शाळेतल्या मोजक्याच आकर्षक मुलींपैकी एक. दिसायला सुंदर, घारे डोळे, दोन वेण्या, दिसण्यात इतर मुलींपेक्षा जराशी नाजूक. पण बोलायला लागली तर तीची बडबड थांबायचीच नाही. छोटीशी बाहुलीच जणू. तीच हसणं रुसणं सगळेच नीरवने अनुभवलेलं. अगदी ज्यूनिअर केजीपासूनचे ते मित्र होते.

‘पण आता सुबोधचं काय?’ नीरवला सुबोध आठवला आणि सकाळची शाळेतली मोरपीसं टोचायला लागली. एवढ्या वेळात त्याचं काही लक्षातच नाही आलं. अख्ख्या शाळेला माहीत होते की सुबोध मेघनाच्या किती मागे लागलाय ते. आणि त्यात अजून भर म्हणजे सुबोध

नीरवचा खास मित्र. पुढे काय करायचे या विचारांत बरीच काथ्याकुट करून शेवटी त्याने ठरवले की जे नशिबात असेल तसंच होऊ द्यायचे.

आता हे रोजचंच झालं होतं. त्यांचं एकमेकांकडे पाहणं, लाजणं, एकमेकांना वही पुस्तक पास करणं. एक गोष्ट बदललेली होती. त्यांचं बोलणं कमी झालं होतं. पूर्वी नाही त्या विषयांवर मनमोकळेपणाने बोलणारे ते आजकाल एकमेकांशी समोरच्याचा अंदाज घेऊनच बोलत होते.

डान्सची तयारी जोरात चालू होती. मेघना आणि नीरव खरंच क्युट कपल दिसत होते. डान्ससाठी शाळा सुटल्यावर एक तास त्यांना थांबावे लागत होते. पण दोघेही या गोष्टीसाठी मनातून खुश होते. तेवढाच एक तासाचा सहवास त्यांच्यासाठी सुखावून टाकणारा होता.

नीरवही नकळत मेघनाच्या जवळ येऊ लागला होता. आपले तिच्याशी बोलणे, भेटणे; शाळा सगळं काही कधीच संपू नये असे मनोमन त्याला वाटत होते. तिच्यावर कविताही केल्या पण सुबोधमुळे त्या द्यायचा प्रयत्न नाही केला. पहिल्या प्रेमाच्या नितळ भावनांचा विलक्षण आनंद त्याला येऊ लागला होता. त्यावेळी शाळा सुटल्यावर बाहेर कुठं भेटण्याचा विचारही कुणाला यायचा नाही. म्हणून मग शाळेतच काय ते सुख अनुभवायचं. बाकी डोळ्यांत आता सदा मेघनाच असल्यामुळे रात्रीची स्वप्नांनाही जागा नव्हती.

मोजून अकरा दिवस झाले, मेघना आणि नीरवचा डान्स बसवून पूर्ण होतच आला होता. आणि बाराव्या दिवशी वर्गशिक्षिकेनी जाहीर केले की या वर्षीचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. शाळेशी संबंधीत कुण्या बड्या व्यक्तीचा अकस्मात मृत्यू झाला होता. आणि अश्या परिस्थितीत कार्यक्रम करणे उचित नव्हते.

ते ऐकताच नीरवच्या चेहऱ्यावर त्रासिक भाव उमटले. असं कसं अचानक सगळं रद्द होऊ शकत..? आताच कुठे प्रेमाचा गुलकंद चाखण्याचे दिवस आलेले. मेघनाही हताश होऊन त्याच्याकडे पाहू लागली. पण त्यांच्या हातात काहीच नव्हते. रोज मिळणारा एक तासही हरवून गेला होता. पण अजूनही नीरव वा मेघनाने स्वतःला व्यक्त केले नव्हते. नीरवने मेघनाला तर अजून जाणवूही दिलं नव्हत की तो सुद्धा तिच्या प्रेमात आहे.

एखाद्याचं आयुष्य सुखमय करण्यासाठी जगातल्या सगळ्याच चांगल्या शक्ती कितीही एकत्र येऊन प्रयत्न करू लागल्या, तरी शापित व्यक्तींसाठी त्यांचा शापच पुरेसा असतो सगळ्या आयुष्याची वाताहत करण्यासाठी. तोच त्यांचा सखा असतो.. आजन्म.. त्यातून सुटका नाही.

नीरवच्या आयुष्यात तर ही नुसतीच सुरूवात झाली होती. इतक्या दिवसांतल्या सुखावरती एका क्षणात दुःखाने कडी केली होती. आता मेघनासोबत आनंदाचे क्षण अनुभवणे थोडे अवघड होऊन बसले होते.

“बरं झालं यार.. तुमचा डान्स रद्द झाला.. मला तर वाटलेले तू तुझ्या वहीणीशीच लग्न करतोयस की काय ? .. शाळेतल्या मधल्या सुट्टीत सुबोध नीरवकडे जाऊन म्हणाला .

“सुबोध, मला त्याबद्दलच तुझ्याशी जरा बोलायचं होतं.” ..नीरव.

“अरे.. मग बोलना.. यार तुला सांगतो जीव जळायचा, तू आणि ती सोबत जायचास तेव्हा.. मनच लागायचं नाही वर्गात तुम्ही डान्स प्रॅक्टीसला गेल्यावर..” सुबोध.

झालं… जे काय भविष्य होतं ते नीरवला कळून चुकलं. इथे आता उगाचचा त्रिकोन करून गुंता वाढवणं बरोबर नव्हते; हे ही एव्हाना नीरवला उमगले होते. सुबोधशी निखळ मैत्री असल्याने त्यात खडा टाकणे नीरवला जमले नसते.

“बोल ना.. काय झाले?.. काय बोलायचे होते. सुबोधने पुन्हा जोर देऊन विचारले.

“तु खरंच प्रेम करतोस का मेघनावर..? नीरव.

“बस काय नीऱ्या… कधीपासूनचं प्रेम आहे आपलं तिच्यावर. प्रपोज पण केला पण नाही बोलतेय. खुप समजावले तिला उत्तर तेच असतं तिचं. तरी मी हार माननार नाही. लग्न

करेन तर तिच्याशीच. पहिलं प्रेम आहे रे माझं ती. एक दिवस कंटाळून तरी हो बोलेलच ती." .. सुबोध.

"ठीक आहे", इतकंच बोलून नीरव तिथून निघाला.

त्यादिवशी शाळा सुटल्यावर नीरवला ब्युटी क्विन पुजासोबत घरी जाताना सर्वांनी पाहीले. खरंतर पुजा म्हटले की सगळ्यांच्या नजरा तिच्यावरच असायच्या. मुलं तिच्या अदाकारीवर दिवाणी झाली होती आणि मुली ईर्ष्येने तिच्याकडे पाहायच्या. तिच्यासोबत नीरवचे असणे मग शाळेत पसरायला वेळ लागला नाही. आणि त्याहून महत्वाचं म्हणजे पुजा मेघनाचीही मैत्रीण होती. सुबोध आणि मेघनाच्या सेटींगचा प्रयत्न पुजाच करत होती.

दुसऱ्या दिवशी शाळेत बोभाटा झाला की, नीरवने पुजाला प्रपोज केला.

# ‘प्रेम’ कि ‘मैत्री’?

“काय….? शुद्धीवर आहेस का..?” मेघनाने गीताला रागातच विचारले.

गीताने शाळेत आल्याआल्याच कालचा वृत्तांत मेघनाला सांगितला तसा मेघनाचा पारा चढला होता. ‘नीरव, तेही पुजासोबत.. कसं शक्य आहे हे? दोघेही दोन टोकाची माणसं.. आणि नीरवनी पुजाला प्रपोज करणे हेच नेमकं मेघनाला रूचलं नव्हतं.

यामागचं सत्य काय याची शहानिशा करणे आता मेघनासाठी निकडीचे होते. सरळ जाऊन तिने पुजाला गाठले आणि कालच्या प्रकाराबद्दल विचारले. पुजाने कोणतेही आढेवेढे न घेता स्पष्टच सांगितले, “हो गं.., मलापण अनपेक्षित होतं हे त्याचं प्रपोज करणं. पण मी तर नाही म्हटले त्याला. माझ्या टाईपचा नाही गं तो. आणि मला माहीत नाही का गं.. तो तुला किती आवडतो ते..! माझं उत्तर ऐकून कसलं तोंड झालं होतं माहीत आहे का त्याचं.” पुजाने जाणीवपूर्वक हे सर्व मेघनाला सांगताना आपल्या चेहऱ्यावरती खट्याळपणाचे भाव आणले होते.

आणि त्याचा व्हायचा तो परिणाम मेघनावर झाला. तिच्यासमोर नीरवचा बिच्चारा चेहरा येऊ लागला होता. प्रेमात ठुकरावलेल्या नीरवबद्दल तिच्या मनात अजूनच सहानुभूती वाटू लागली.

कसंना.. एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात असताना आपल्या मनात त्याला आपलंसं करून घेण्याची सुप्त इच्छा असते. त्याच व्यक्तीने मग आपल्याला कळत नकळत दिलेला त्रासही क्षुल्लक वाटू लागतो, आणि त्यापुढंही जाऊन त्या व्यक्तीला इतर कोणी दिलेला त्रास मात्र आपल्याला जाणवू लागतो. प्रेमाच्या परिभाषेत ही बाब प्रकर्षाने येते.

नकळत नीरवने आपल्याला नकार दिलाय. पुजाकडून प्रेमात मिळालेल्या नकाराने नीरवची अवस्थाही माझ्यासारखी नको व्हायला. मेघनाच्या मनात राहून राहून हेच विचार येत होते. नीरव आपल्यापासून लांब जातोय हे दिसत असूनही त्याला होऊ शकणाऱ्या प्रेमभंगाच्या वेदना मेघनाला जाणवू लागल्या होत्या.

“काय गं, कुठे हरवलीस?” पुजाच्या प्रश्नानं मेघना भानावर आली.

“नाही गं.. असंच थोडं.” मेघनाचं प्रत्युत्तर.

“ऐक ना.. उदया संध्याकाळी येणार आहेस ना माझ्या घरी. माझा वाढदिवस आहे. आपल्या शाळेतली बरेचशी मुलं येणार आहेत.” पुजाने अगदी हट्टानेच मेघनाला यायला सांगितले.

“सगळे येणार आहेत तर येईनच मी. घरी सांगेन तसं. पण किती वाजता..? मेघनाने विचारले.

“सात वाजता तू सुबोधच्या घराजवळ येऊन थांब.. मी येते तुम्हाला घ्यायला.. ” पुजाच्या वाढदिवसाला बोलावण्यामागचा मतितार्थ मेघनाने चटकन ओळखला. पण तसं न दाखवता तिनं यायचं कबूल केलं.

मेघनानंही इकडे आपला वेगळाच प्लान आखला. तिला माहीत होतं की पुजा आपल्याला सुबोधविषयीच समजावण्याचा प्रयत्न करणार. तरीही मेघना सुबोधच्या घरी येण्यासाठी तयार झाली होती.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास मेघना नीरवच्या दरवाज्यात उभी होती.

“नीरव, चल आपल्याला लौकर निघायचं आहे.” ..मेघना.

“अगं पण कुणीकडं..? नीरवने विचारले.

“नाही सांगितले तर येणार नाहीस का तू..? माझ्यावर विश्वास नाही का तुला..? जराश्या रागातच मेघनाने उत्तर दिले. “ठीक आहे बाबा चिडू नकोस..” असं बोलून नीरव चप्पल घालून निघू लागला.

दोघेही एकमेकांशी न बोलताच चालत होते. खरंतर बोलण्यासारखं खुप काही होतं दोघांकडे. पण शब्द ओठांची साथ देत नव्हते. ज्युनियर केजी पासूनची मैत्री.. तेव्हा तर मैत्री काय असते हे ही त्यांना माहीत नव्हते. तरी त्यांनी एकमेकांसाठी केलेल्या छोट्या छोट्या गोष्टी अजूनही लक्षात होत्या त्यांच्या.

तिच्या मनावर तर याचंच अधिराज्य होतं अगदी अगोदरपासून. मैत्रीचं रूपांतर कधी प्रेमात झालं हे तिचं तिलाच कळलं नव्हतं. आणि आता तर ते प्रेम इतकं परिपक्व झालेलं की स्वार्थ, ईर्षा यापलीकडे जाऊन समजू लागलं होतं.

सात वाजायच्या सुमारास दोघेही सुबोधच्या घराजवळ पोहोचले. तिथे अगोदरच उपस्थित असलेल्या पुजाने नीरवच्याही येण्यावर आश्चर्य व्यक्त केले. कुठल्याही विषयाला मग गोल गोल न फिरवता मेघनाने सर्वांसमक्ष थेट मुद्द्याला हात घातला.

“पुजा, मला माहीत आहे तू फक्त तूझ्या वाढदिवसानिमित्त मला इथे नाही बोलावलेले…”… मेघना शांतपणे म्हणाली.

समोर उभे असलेले सुबोध आणि नीरव गपचूप सगळं ऐकत होते.

” बरं, तुला जर माहीतच आहे तर मग प्रॉब्लेम काय आहे मेघना.. आज ही गोष्ट आपण क्लियरच करूया. काय कमी आहे गं सुबोध मध्ये?” “खरं प्रेम करतो तो तुझ्यावर.. तुझ्या इतक्या

नकारांनी जर दुसरा कोणी असता तर कधीच बाजूला झाला असता..” पुजा अनुभवी व्यक्तीसारखी मेघनाला समजावत होती.

सुबोध डोळ्यात पाणी आणून चुपचाप होणारा प्रकार ऐकत होता.

आणि नीरव…

नीरवला समोर फक्त मेघना दिसत होती. नाजूकशी बाहुली… या बाहुलीला आपलं करावं असं खुप मनात आलं त्याच्या. किती छान होईल ना.. आमच्या म्हातारपणी आठवण्यासाठी फक्त आमचं तारूण्यच नसेल.. तर आमचं निरागस बालपणही असेल.. शाळेच्या सुरूवातीपासूनच्या दिवसांतलं. आजपर्यंतचा मेघनासोबतचा प्रवास किती छान घडला… तिनं मैत्रीपूर्वक दिलेली ग्रीटींग्स अजूनही कपाटात आहेत.. कसं कधीच मनात नाही आलं माझ्या की आमचं नातं मैत्रीपलीकडचं आहे की मनात अगोदरपासूनच तिला गृहीत धरलं होतं…. असो आता तरी व्यक्त व्हावं तिच्यापुढे..

नीरव मनातले विचार थांबवत पुजा आणि मेघनाचं संभाषण ऐकू लागला.

पुजाने जमेल त्या तऱ्हेने मेघनाला समजावण्याचा पूर्ण प्रयत्न केला होता. जोडीला सुबोधनेही आपलं मन मोकळं केलं होतं. तो त्याच्या विचारांवर ठाम होता. सर्व ऐकून मेघनाच्या चेहऱ्यावरून तरी असं वाटत होतं की ती सुद्धा सहमत होत आहे त्यांच्याशी.

“बघ मेघना.. प्रेम त्याच्यावर करावं जो आपल्यावर प्रेम करतो....,” पुजाने आपल्याकडून शेवटचं सांगितले.

“खरंच पुजा, तू म्हणतेस ते खरंच आहे.. मला पटलंय तुझं म्हणणं आणि सुबोधचं माझ्यावरचं प्रेम..” मेघना उत्तरली.

मेघनाचं उत्तर ऐकून नीरवच्या काळजात धस्स झालं. ते शब्द ह्रदयाची चिरफाड करायला पुरेसे होते. नीरव डोळयांत येणारी आसवं थांबवण्याच्या वायफळ प्रयत्न करू लागला. सुदैवानं ते तिघं आपल्या चर्चेमध्येच व्यस्त होते. त्यामुळे आसवं पुसताना कोणी पाहू शकलं नाही.

मेघना पुढं बोलू लागली.. “सुबोध, माझा होकार तू अगदी या क्षणापासून समजू शकतोस.. पण तरीही मला थोडा वेळ दे. सध्याची माझ्या मनाची परिस्थिती तितकीशी चांगली नाही..”

“तुला अगदी हवा तितका वेळ घे.. मी तसंही तुझी वाट पाहतच आहे. आणि तुझ्यावर कसलाही दबाव टाकून मला हे प्रेम नाही मिळवायचं. अगं तुला पाहताक्षणीच तुझ्या प्रेमात पडलेला मी. तू भेटशील या एका आशेवरच आहे ..” ....सुबोध.

सुबोधच्या उत्तरानं जितकी मेघना खुश झाली तितकाच नीरव गोंधळून गेला. साला सुबोध एकदा जरी काही चुकीचं बोलला असता तर प्रश्नच मिटला असता. पण हा प्रत्येकवेळी मेघनाच्या विषयात सेन्टी होतोय म्हणजे नक्कीच हा तिच्या प्रेमात वेडा झालाय. मित्र की प्रेम या द्विधामनस्थितीत अडकलेला नीरव कोणत्याही एका मतावर ठाम होत नव्हता. दोलायमान स्थितीतलं पारडं प्रत्येकाच्या नव्यानव्या खुलाशानुसार कधी मित्राकडं तर कधी प्रेमाकडं झुकत होतं.

“ओके ठीक आहे मग.. थॅंक्स..” असे बोलून मेघना पुजाकडे वळली.

“पुजा.., प्रेम त्याच्यावर करावं जो आपल्यावर प्रेम करतो खरं ना..?” मेघना.

“हो अगदी खरं, मी खुप खुश आहे शेवटी तू आणि सुबोध एकत्र आलात..” पुजा.

“मग नीरवबद्दल काय विचार आहे तुझा…?” मेघना.

मघापासूनच्या चर्चासत्रात या एका प्रश्नाने भयाण शांतता पसरली.

मेघनाचा डाव नीरवच्या लक्षात आला.. अन् जराही वेळ न दवडता त्याचा हात पुजाच्या हातात गेला.. ही कृती नीरवने जाणून केली की नकळत एक प्रतिक्रिया म्हणून घडली हे

खुद्द नीरवला कधीच कळाले नाही. पुजाही पुरती बावरली.. आणि सुबोधला यांचं नेमकं काय चाललंय हेच उमगत नव्हतं…

“माझ्याबद्दल काय विचार असणार आहे हिचा. आम्ही तर अगोदरच एंगेज्ड आहोत..” नीरव चेहऱ्यावर हास्य आणत आणि पुजाचा हात हलकाचा दाबत म्हणाला.

“हो ना.. म.ई.. मी नां.. काल संध्याकाळीच नीरवला भेटून होकार कळवला.. राहवलंच नाही गं बाई मला, शेवटी ‘प्रेम त्याच्यावर करावं जो आपल्यावर प्रेम करतो….हो ना?’ पुजानं कसंबसं वेळ मारायचं काम केलं.

या तिच्या स्पष्टीकरणावर चौघे हसु लागले.

“चला घरी निघू आता.. अगं पुजा तुझा वाढदिवस..?” मेघनानं पटकन आठवल्या सरशी विचारलं.

“वाढदिवस..? ते काय असतं..” म्हणत पुजा हसु लागली तशी सुबोधनंही तिला साथ दिली.

“खोटारडे.. पाप लागेल तुला.. ” खोट्या रागात मेघना म्हणाली.

“अरे.. किसीको उसका प्यार मिलाके देना पुण्य का काम होता है!” पुजानेही लव्हगुरूच्या थाटात आपल्या कामगिरीचं कौतुक करून घेतलं.

साधारण एक तासाच्या चर्चासत्राला पूर्णविराम लागून चौघे निघाले. मेघनाला सोडायला सुबोध सोबत गेला. इकडे पुजा आणि नीरव हळूहळू चालत होते. पुजाचं घर जवळच होतं. बोलता बोलता पुजाने नीरवच्या प्रसंगावधाचं कौतुक केलं. नीरवनेही पुजाचे अगदी परवाच्या भेटीपासून ते आतापर्यंतच्या तिच्या ॲक्टींगबद्दल आभार मानले.

नीरवचं पुजाला प्रपोज करणं, तिचा नकार, शाळेतला बोभाटा हे सर्व त्यांच्यात अगोदरच ठरलेलं होतं. पण मेघना थोडी स्मार्ट निघाल्यामुळे त्या नकाराला ऐनवेळेस होकारात बदलावं लागलं होतं.

“नीरव.. आता पुढे काय आणि किती दिवस…?” पुजा.

“दहावी संपायला चारच महीने उरलेत तोवर हे नाटक करू.. नंतर आपल्या वाटा वेगळ्याच होतील ना. तोपर्यंत त्यांचही प्रेम फुलेल..” नीरवचं बोलणं संपता संपता दोघेही हसू लागले.

“पुजा, आपली वाट आताच वेगळी झाली की गं..” पुजाच्या घराकडे बोट दाखवत नीरव म्हणाला.

“हो ना.. चल बाय, थॅंक्स…” पुजा.

“बाय.. थॅंक यु…” नीरव.

पुजाला सोडून निघालेल्या नीरवची पावलं आता झपाझप पडू लागली.. कसलंसं ओझं मनावर असल्यासारखं.. काहीतरी हक्काचं हरवल्यासारखं.. रस्त्यावर दिसणारे माणसांचे चेहरे काहीसे उर्मट काहीसे त्रासिक दिसत होते. कुत्रेही एकमेकांवर भुंकत राग व्यक्त करत होते. मनातलं दुःख सभोवतालच्या सर्वच नजाऱ्यावर हावी होऊ लागलेलं. रात्रीच्या अंधारातलं टपोरं चांदणं आज तितकंसं खास दिसत नव्हते. आकाशातला चंद्र स्पष्ट दिसत होता…

पण त्याचा चंद्र.. दुसऱ्या कोणाबरोबर तरी होता. हो झालं प्रेम तिच्यावरती पण तिचं आपल्यावरचं प्रेम कळाल्यानंतर. मित्र तर अगोदरपासूनच तिच्यावर प्रेम करत होता. परीस्थिती सगळी कळून वळलीही होती. पण तरीही धाडस झालं नाही त्याचं, मित्राच्या स्वप्नाआड यायचं..

तिलाही दुखावणं सपशेल चुकीचंच होतं पण उद्या ‘मैत्री की प्रेम’ या प्रश्नाला उत्तर देताना जगातलं सर्वात सुंदर नातंच जपायचं होतं..

त्याचं शाळेतलं पहिलं प्रेम सुरू होण्याआधीच संपलं....

'प्रेम' कि 'मैत्री' यावर आपलं काय उत्तर असेल..? नीरवने खरंच योग्य केलं का?

## प्रेम फक्त एकदाच होतं का..?

कदाचित शेवटचं प्रेम भेटेपर्यंत हा प्रवास चालुच असतो.

नुकत्याच दहावीच्या परीक्षा संपल्या होत्या. उन्हाळयाच्या सुट्टीत मित्रमैत्रिणी गावी जायच्या तयारीत होती. तोही जायचा दरवर्षी अगदी न चुकता. पण यावर्षी कुणास ठाऊक मन तयार होत नव्हतं त्याचं. गावाकडच्या नदीत मारलेल्या डूबक्या, झाडावर चढून चोरून खाल्लेले आंबे, शेतातल्या जमिनीत पिकवत घातलेले फणस, घरातली गाय सगळं खुप आठवत होतं. पण मन इथून निघायला तयार नव्हतं.

अजूनही तो मेघनाच्या आठवणींत होता. गेले चार महीने खुप अवघड गेलेले. इतके दिवस तर मेघनाचा चेहरा डोळयांसमोरून घालवण्यासाठी अभ्यासात झोकून दिलं होतं. त्या परिस्थितीत खरंतर अर्जुनाची एकाग्रताच हवी होती, आणि नीरवने अभ्यासावरून आपलं चित्त जराही ढळू दिलं नव्हतं.

पण आता सुट्टी लागली आणि एकटं मन पुन्हा खायला उठलं. चार महिन्यांपूर्वी जे काही घडलं होतं त्यातली आपली बाजू त्यानं कोणापुढंही मांडली नाही. आणि बहुतेक तेच त्याला आतल्या आत खात होतं.

आज संध्याकाळीही असंच झालं.. घरात जशी दर्दी गाणी चालू झाली.. अगदी मनातल्या जखमांच्या वेदना असह्य होऊन नीरव बाहेर चालू लागला.

कुठं जायचंय? काय? कशासाठी?, कसलाच पत्ता नाही. पाऊले नेतील तिथं जाऊ लागला तो. आणि चालता चालता त्याच्या शाळेचं पटांगण आले. जवळच्याच एका पायरीवर फतकल मांडून नीरव बसला. अगदी काही क्षणातच तो मेघनाच्या आठवणींत गुंग झाला. सभोवतालचं सगळं विसरून..

दूर क्षितीजावर मावळत्या सूर्याची लाली पसरली होती. पटांगणात छोट्या मोठ्या ग्रुपने मुलं खेळत होती. शाळेचं पटांगण नेहमी खुलं असल्याने कुणीही तिथं येऊ शकत होतं. एका कोपऱ्यात तीन-चार मुली गप्पा मारत होत्या. सर्वजण आपापल्या दुनियेत खुश दिसत होते.

मग आपणचं दुःखी का..? छ्या.. यापेक्षा आपल्याला कळालंच नसतं तर बरं झालं नसतं का..? नको तो त्रास उगाचचा.. ‘जग मेला पर मैं अकेला..’ अशी अवस्था झाली आहे माझी.. ती विसरली असेल का मला.. की सुबोधसोबत खुश असेल ती..

हुश्श.. झालं ते जाऊ दे.. विसरेन मी तिला.. अवघड असं काहीच नाही त्यात..

नीरवच्या मनात सुमारे तासभर तरी अशीच कालवाकालव चालू होती. स्वाभाविक प्रतिक्रियेप्रमाणे त्याचे हात उठले नकळत आलेले अश्रू पुसण्यासाठी.. आणि.. डाव्या बाजूला नजर गेली. दोघांची नजरानजर व्हायला एकच वेळ साधून आली होती.

ती.. थोड्याच अंतरावर बसली होती. शुभ्र रंगाचा ड्रेस, मानेपर्यंतचे केस त्यांना साजेसा गोलसर चेहरा, हातात फिकट गुलाबी रंगाचा रूमाल.. अन् डोळयांतून वाहणाऱ्या गंगायमुना.. त्याच्या शाळेत तर नव्हती ती पण एवढं नक्की की आसपासच कुठेतरी राहत असावी.

दोन दर्दी.. एकमेकांकडे पाहूनही न पाहील्यासारखं करणारे.. दोनवेळा नजरेची देवाणघेवाण झाल्यावर नीरवनंच किंचीतशी स्माईल दिली. तिनंही हलकसं हसून प्रतिक्रिया दिली. आपण दोघेही एकाच नावेतले प्रवासी आहोत हे कळायला वेळ नाही लागला त्यांना.

थोड्याच वेळात ते दोघं एकमेकांशेजारी होते. खरंतर एखाद्याशी ओळख नसताना एकमेकांशी बोलणे कुणीही टाळतेच. पण दोघांनीही एकमेकांना रडताना पाहीले होते. आणि हीच एक नाळ होती जी त्यांना एकमेकांशी बोलायला भाग पाडत होती.

तिनं सांगायला सुरूवात केली.. सोनल नाव होतं तिचं. नकळत झालेलं प्रेम.. तात्पुरतं आकर्षण.. प्रेमभंग.. आणि त्यातनं आलेलं नैराश्य.. सर्वकाही ती हमसून हमसून सांगत होती. नीरवने तिला शांत व्हायला सांगतले.

मेघना जाण्याच्या दुःखाने नीरवमध्येही कमालीचा बदल झाला होता. अचानक वयात आलेल्या मुलाप्रमाणे त्याच्यातला समंजसपणा वाढलेला. त्यानं परिस्थिती नीट हाताळत तिला शांत केलं.

“या अनुभवातुन काही शिकायचं आहे की असंच रडायचं आहे?” – नीरव.

त्याच्या बोलण्यातला रोख उमगुन तिचं रडणं थांबलं.

“तु का रडत होतास..?” – सोनलनं त्यालाही बोलतं करण्याचा प्रयत्न केला.

“मी कुठे रडत होतो..?” नीरव.

“मी पाहीलेय तुझे डोळे.. आता नाकारू नकोस.. रडला तर रडला त्यात काय..?” सोनललाही ऊत्सुकता लागली होती त्याची कहानी ऐकण्याची.

“हे बघ, जिच्यासाठी मी रडत होतो तीचे विचार मी मघाशीच मागे सोडले आहेत. आणि हा यापुढे असल्या झंझटमध्ये मी पडणारच नाही. त्यामुळे सांगून काय उपयोग नाही.” नीरवनं एका दमात सगळे सांगितले.

“बरं बाबा.. जाऊ दे.. थॅंक्स तुझ्याशी बोलून छान वाटले. फ्रेंडस्..? ..सोनलने मैत्रीचा हात पुढे केला.

“फ्रेंडस..” नीरवनेही त्यांच्या मैत्रीवर शिक्कामोर्तब केले.

घरी जाताना रोज तिथंच सात वाजता भेटायचं ठरवून दोघे निघाले. त्यावेळी कॉलेजच्या मुलांकडेही क्वचितच मोबाईल असायचे. मग यांची तर नुकतीच कुठे शाळा संपलेली. पण मैत्रीत रोज थोडासा वेळ तरी द्यायचा हे नक्की करून ते दोघं घराकडे मार्गस्थ झाले.

दुसऱ्या दिवसापासून ते रोज तिथेच भेटू लागले. आकर्षण असं काही नव्हतं फक्त एकटेपणा दूर करण्यासाठीची ओढ होती ती. आणि नीरवने तर अगोदरच स्पष्ट केलं होतं की त्याला असल्या झंझटमध्ये पुन्हा पडायचे नाही.

त्यांच रोजचं एकमेकांना भेटणं वाढलं होतं. अजूनतरी या नात्याला त्यांनी मैत्रीचंच नाव दिलं होतं. पण खरंच ही मैत्री होती की नकळत फुलत चाललेलं त्यांच्यातलं प्रेम.. याचा अंदाज दोघांनाही अजून आला नव्हता.

सोनलनेही याच्याबरोबरच दहावीची परीक्षा दिली होती. फक्त त्या दोघांच्या शाळा वेगवेगळया होत्या. सुट्टीतले दोन महीने खुप छान चालले होते. त्यांच भेटणं, बोलणं यातूनच ते समोरच्याला समजून घेत होते. नात्यातला पाकळ्या हळूवारपणे खुलू लागल्या होत्या.

‘खरंच ही फक्त मैत्री आहे की त्यापल्याड आपले नाते सरकलेय..’ नीरव आणि सोनल दोघांनाही हा प्रश्न पडू लागला होता.

आणि एक दिवस सोनल आलीच नाही.. तासभर वाट पाहीली नीरवने. बैचेन झालेला तो सारखा चहुबाजूला पाहत होता. कुठूनही येईल ती अचानक. पण नाहीच आली ती. का? काय झाले असेल? ती ठीक तर असेल ना? प्रश्नांची सरबत्ती नीरवच्या डोक्यात सुरू झाली.

तिचं घर तर माहीत होत त्याला पण कधी घरी गेला नव्हता तिच्या. तरी ठरवलंच त्यानं आता जाऊन पाहायला हवं नेमके आज ती का नाही आली.

नीरव साधारणपणे पंधराव्या मिनिटाला तिच्या घराजवळ पोहोचला.

सोनलच्या चाळीत तिच्या घरापाशी पोहोचताच बाहेर चारपाच चांगल्या कपड्यातली माणसं गप्पा मारताना त्याने पाहीली. घरात बायकांची लगबग दिसत होती. तिथंच घुटमळत नीरव त्यां माणसांच बोलणं कान टवकारून ऐकायला लागला.

“मुलगी खरंच छान आहे, बघु आता मामाला सून म्हणून आवडते का..! – एकजण म्हणाला आणि बाकीचे त्याच्या म्हणण्याला दुजोरा देऊ लागले.

आता हे ऐकून नीरवच्या पायाखालची जमिन सरकायचीच बाकी होती.

तडक तिथून निघायला तो मागे वळाला तसे सोनल वरच्या खोलीच्या पायऱ्या उतरत खाली येताना दिसली. मोरपीसी साडीत तिचे रूप अधिकच खुलून दिसत होते. मानेवर रूळलेल्या तिच्या छोट्या केसांनी तिच्या सौंदर्यात आणखीनच भर पडत होती.

सोनलचीही नजर नीरववर पडली अन् त्याला पाहताच एक क्षण ती गांगरली.. आणि ती खाली उतरून काही बोलायला जाणार तेवढ्यात तिला दिसलं की नीरवने रागातच तिच्या चाळीतून पाय बाहेर टाकला होता.

मन खट्टू झालेलं त्याचं पण काही विचार डोक्यात आणायचाच नाही असा चंग बांधुन घरी येऊन टिव्ही पाहत बसला. इकडे सोनलही कावरीबावरी झाली होती त्याला आपल्या घराजवळ आलेला पाहून. काहीतरी सांगायचं होतं तिला पण तो आला तसाच निघून गेला तिथून.. काहीही न बोलता..

कदाचित हीच तर त्यांची शेवटची भेट नसेल ना…?

# स्थितप्रज्ञ

नीरव त्या रात्री जेवलाच नाही. घरी आईला काहीबाही कारण सांगून तो झोपला. झोप कसली येत होती.. तरीही या कुशीवरून त्या कुशीवर वळावळी चालूच होती त्याची. संध्याकाळचा प्रसंग आठवला.. सोनल समोर आली. कसली गोड दिसत होती ती.

तिच्या मोरपीसी साडीवरचं लालसर धाग्यांतलं नक्षीकाम. बॉब कट केसांमुळे तिच्या सौंदर्याला चारचांद लागले होते. काही विशिष्ट मुलींनाच शोभतो बॉब कट. खाली उतरताना एका हातात तिने पकडलेलं पदराचं टोक. दुसऱ्या हातानं साडी जमिनीला लागू नये म्हणून पकडलेल्या नीऱ्या..

‘नीऱ्या…!’ मलापण मित्र नीऱ्याच बोलतात. हा नीऱ्यापण लोळायचा बाकी आहे आता जमिनीवर.. त्याला अलगद पकडायचा विचार नाही आला का तिला..?

‘आणि आताच तर कुठे हिची दहावी झाली आहे. एवढी काय घाई पडलीय घरच्यांना तिच्या लग्नाची..? अहो अजून निकाल पण लागला नाही.. इतक्या कमी वयात कसं काय लग्न लावू शकतात हे?’ ..नीरवच्या मनात विचारांचं काहूर माजलेलं.

दुसरा दिवस त्याच विवंचनेत निघून चालला होता. संध्याकाळ झाली आणि त्याची पावलं आपोआप शाळेच्या पटांगणाकडे वळली. नेहमीच्या जागेवर तो जाऊन बसला. थोड्याच वेळात सोनलही आली. आणि त्याच्या बाजूला बसून स्माईल दिलं. नीरवनं तिच्याकडे पाहीलं.

“अभिनंदन..” ..तुटक्या स्वरात नीरव.

“कश्याबद्दल..” गोंधळलेली सोनल.

“तुझं लग्न ठरलेय ना.. काल तुला पाहायला आलेले ना घरी.. यावेळी नीरवच्या आवाजात थोडा रुक्षपणा आला.

हे ऐकलं आणि सोनल हसत सुटली… “काय रे तु…” मधेच आलेलं हसु दाबत ती आणखीनच खळखळून हसली. “अरे माझ्या ताईला पाहायला आले होते ते… मंद..च.. आहेस..अगदी..” तीचे हसता हसता मोडके शब्द नीरवच्या कानावर पडले.

“माझं वय आहे का लग्नाचं? तू पण ना..” सोनलचं हसू आताकुठे जरा कमी होऊ लागलं होतं.

एवढ्या वेळात फुगलेल्या नीरवच्या चेहऱ्यातील हवा ते ऐकून भस्सकन निघुन गेली. खजिल होऊन त्यानं नजर खाली केली आणि गालावर छानशी खळी उमटली.

"एक मिनिटं.. तुला राग आलेला का? एवढा चिडलेलास म्हणजे..?" तिनं विचारलं.

"नाही गं.. तू मला काही सांगितले नाहीस असं डोक्यात येऊन वाईट वाटले फक्त.. बाकी काही नाही…" नीरव.

"खरंच की अजून काही…तुझ्या मनातही माझ्यासारखंच काही चाललेय का?" सोनल. एव्हाना तिच्या डोळयांत एक वेगळीच चमक आली होती. नीरवही तिच्याकडेच पाहत होता. अन् तिचे बदललेले भाव त्याच्या लक्षात येत होते.

"नाही हं म्हणजे तू तर अगोदरच पूर्णविराम देऊन सांगितलेयस की तू झंझटमध्ये पडणार नाहीयस… मग मला काही विचारण्यासाठी तू जागाच नाही ठेवलीस… सोनल अजून खुलासा करून बोलू लागली.

नीरवला तिचा इशारा कळला.. "अगं तसं नाही, ते माझं दोन महिन्यांपूर्वीचं मत होतं… आणि मी झंझटबद्दल म्हणालो होतो.. तू थोडी झंझट आहेस…. तू मला आवडू लागली… आणि बोलता बोलता नीरव गप्प झाला.

सोनललाही ऐकायचं होतं पुढचं.. पण तीही गप्प राहीली. तिला त्याचा स्वभाव माहीत होता. थोडावेळ कुणीच काही बोलले नाही. दोघांच्या नजरा जमिनीकडे होत्या अन् चेहऱ्यावर मोजकंच हसू.

घरी निघायची वेळ झाली तशी तिनं सभोवताली नजर फिरवली. साडेसात वाजले होते.. अंधारानं एव्हाना सभोवतालचं सगळं आपल्या कुशीत घेतलं होतं. शाळेच्या पटांगणात तुरळकच मुले होती. कोणाचंही लक्ष नव्हतं इकडे यांच्याकडे...

“मलाही तू खुप आवडतोस.... अगदी दोन सेकंदामध्ये हे वाक्य संपवून सोनलने नीरवच्या गालावर चुंबन घेतले अन् पळत सुटली.

काय झाले हे समजायलाच नीरवचे पुढचे चार सेकंद गेले. मनात उसळणाऱ्या लाटांची अवखळ खळखळ... अन् तरीही तो शांत सागरासारखा.. तिला पळताना पाहत... गालांत हसत...

प्रेमाच्या कळीनं खुलायला सुरूवात केली होती. आपलं नातं दोघांनीही मान्य केलं होतं.

आता त्यांचं भेटणं औपचारीक राहीलं नव्हतं. रोज बाजूला बसताना हात हातात असायचे. स्पर्शातून प्रेम व्यक्त केलं जायचे पण नैतिकता सांभाळून. तो स्पर्श फक्त हातावर फिरणाऱ्या बोटांतून जाणवावा असा. त्यात उगाचच वेळेआधी केलं जाणारं आगाऊपण नव्हतं.

डोळयांत स्वप्ने असायची... जगण्याची.. एकमेकांसोबत..

पुढचं शिक्षण, कॉलेज कसं करायचं; कुठे करायचं.. भेटायची जागा आता बदलायला हवी, या अन् असल्या अनेक विषयांवर चर्चा व्हायची.

पाहता पाहता दिवस भूर्रकन उडून गेले. दहावीचा निकाल लागला. दोघंही फर्स्ट क्लास मध्ये पास झाले. एकाच कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यासाठी मार्ग आता अधिकच सुलभ झाला होता. सगळं अगदी मनासारखं घडत होतं त्यांच्या. मनसोक्त आता ती दोघं बाहेरही भेटू शकत होते, कारण आसपास घरापासून जवळ असे कोणतेही कॉलेज नव्हते.

“उद्या सर्व घरातल्यांसोबत गावी देवदर्शनासाठी जायचं आहे.., ताईच्या लग्नासंबंधी बोलणी करायला बाबाही तिथूनच बाजूच्या गावी जाणार आहेत..” सोनल म्हणाली.

“परत कधी येणार..? तिकडचा फोन नंबर आहे का?” नीरवनं काळजीतच विचारलं.

“अरे हो बाबा… चार दिवसांत लगेच येणार आहोत. अजून काही लग्नाचे ठरले नाही तिच्या.. आणि माझं ॲडमिशन पण करायचं आहे ना..? आणि हो, गावच्या घरी फोन नाही.. पण तू काळजी करू नको.. मी तिथं कुणाचा हात धरून पळून जाणार नाही…” सोनलच्या बोलण्यात खोडकरपणा होता.

“ठीक आहे गं.. असंच आठवण आली तर काहीतरी मार्ग असावा बोलण्याचा म्हणून विचारले मी..” नीरव अजूनही चिंताग्रस्त अवस्थेत होता.

“नको रे टेन्शन घेऊ.. मी लगेच परत येईन. आणि काळजी घे स्वतःची.” सोनललाही थोडं वाईट वाटत होतं.

“ओके.. गाडी संध्याकाळची असेल नां.. मग दुपारी येशील भेटायला..?” नीरवने व्याकुळतेनं सवाल केला.

“किती प्रेम करतोस माझ्यावर.. चार दिवसपण नाही निघत वाटतेय तुला..” तिचे डोळे भरून आले. “उद्या सकाळीच काकांकडे जाणार आहोत, तिथून मग त्यांच्या कारने गावी जाणार..” सोनल.

“अच्छा असं आहे होय.. ठीक आहे जावा नीट.. आणि आठवणीत ठेवा आम्हा गरीबाला..” नीरवनं खेळकर वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न केला.

तीही खुदकन हसली. त्याचा हात घट्ट पकडत अलविदा करून गेली..

दोघांचंही नितांत प्रेम होतं एकमेकांवर. त्याचाच भाग म्हणून की काय दुसऱ्या दिवशी रात्री झोपलेल्या नीरवच्या स्वप्नात ती आली. तशी बऱ्याचदा नीरवच्या रात्री तिनं जागवलेल्या. पण या स्वप्नात तिचं प्रेम जरा जास्तच ओसंडू पाहत होतं…

'शाळेच्या पटांगणातल्या पायऱ्यांवर सोनल मोरपीसी साडी नेसून बसली होती. तिच्या मांडीवर डोकं ठेवून नीरव शांत पहुडला होता. त्याच्या इवल्याश्या केसांवर फिरणारे तीचे हात जणू त्याच्या कधीकाळच्या दुःखावर फुंकर मारत होते.'

कसलासा आवाज झाला अन् त्याची तंद्री भंग पावली. सोनलही चटकन गायब झाली आणि त्याचं डोकं पायऱ्यांवर आपटलं. त्याने डोळे उघडून पाहीलं तर उशी तशीच होती डोक्याखाली. घरातलंच कोणीतरी उठलं होतं वाटते असा विचार करून नीरव पुन्हा झोपी गेला.

चार दिवस-आठ दिवस गेले, सोनलच्या घरी पंधरा ते वीस चकरा झाल्या नीरवच्या, पण घर बंदच होते. तिच्या आसपास कोणी ओळखीचे पण राहत नव्हते. महीना गेला. न राहवून नीरवने सोनलच्या शेजारी सहज म्हणून विचारले.

“अरे, त्यांच्या गाडीचा अपघात झाला गावी जाताना.. पवार, त्यांच्या मिसेस, मोठी मुलगी गंभीर दुखापतीतून वाचले पण त्यांची लहान मुलगी सोनल आणि पवारांचे भाऊ दगावले.” शेजारी खंत करत म्हणाला.

पुढेही काहीतरी सांगत होता शेजारी.. सोनल खुप चांगली होती का कायतरी…

पण ते न ऐकण्याइतपत कान बधीर झाले होते नीरवचे. असं वाटत होतं की कुणीतरी घण घेऊन आलटून पालटून तो दोन्ही कानांवर मारला होता. त्यामुळंच सगळं सुन्न होत चाललेलं…

ढासळलेल्या बुरूजासारखं कोसळून जावं असं क्षणभर वाटलं त्याला. अगदी क्षणभरच.. दुसऱ्या घडीला आईवडील आठवले. सहा महीन्यातला हा दुसरा आघात पचवायचा होता..

अन् तो मनात दाटलेल्या सगळ्या भावनांवर अंकुश ठेवून स्थितप्रज्ञतेने चालत राहीला..

सोनलच्या गोड आठवणींत..

## शेवटच्या वळणावर...

सोनलच्या आठवणी सोबत घेऊन नीरवने आयुष्याची वाटचाल चालू ठेवली. कॉलेज, घर करत करत अवघे सहा महीने झाले असतील तोच नीरवच्या बाबांना आजारानं घेरलं. घरातला कर्ता पुरूष अंथरूणाला खिळल्यानं जबाबदारी नीरवकडे आपसूकच आली.. किंबहुना त्यानं ती घेतली. आईनं लाख समजावलं की ती काही काम करून घर सांभाळेल.. पण आईचं जगणं त्यानं पाहीलं होतं. या वयात तिला हालअपेष्टा करू देणे त्याला पटणारं नव्हतं.

अवघ्या सहा महीन्यातच कॉलेजला रामराम ठोकून लहानश्या गॅरेजमध्ये मॅकेनिकची नोकरी पत्करली त्यानं.. दहावीत फर्स्ट क्लास मध्ये पास झालेला तो. एक वर्षे तिथं काम केलं. तिथून मग एका सायबरमध्ये कंप्युटर असेंब्लींगच काम करू लागला. आता पैसेही चांगले मिळू लागले होते. मधल्या काळात विशेष असं काहीच घडलं नाही. फक्त दहावीनंतरचा एक वर्ष गॅप सोडून नीरवनं बारावीची परीक्षा दिली अन् पासही झाला.

घरची परीस्थिती नीरव कमावता झाल्यापासून हळूहळू सुधारत चाललेली. लहानपपणापासूनच हात आखडता घ्यायची सवय त्याने स्वतःला लावली होती. आईवडीलांनी त्यांच्या परीने आपल्या शिक्षणासाठी प्रयत्न केले होते हे तो जाणून होता. आईवडीलांकडून एक गोष्ट मात्र त्याला हवीहवीशी अशी भेटली होती ते म्हणजे स्वातंत्र्य किंवा त्याची प्रायव्हसी.

पण या स्वातंत्र्याचा नीरवने कधी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला नाही. ना कधी वाईट संगतीशी जुळवून घेतले, ना कुठली वाईट सवय लावून घेतली. भूतकाळाच्या जखमांमुळे कधी कोणत्या मुलीला आसपास फिरकूही दिलं नव्हतं त्यानं.

नीरवचं मन कधीच कुणापुढं मोकळं झालं नाही. मनातल्या दूरवरच्या अडगळीतल्या कोपऱ्यात त्यानं त्याची दुःख साचवून ठेवली होती. दुःख फक्त मेघना किंवा सोनलपुरतीच मर्यादित नव्हती. त्यानंतरही खुपश्या खस्ता खालल्या होत्या त्यानं. कामात सर्वस्व झोकून देणारा नीरव, पण श्रेय कुणी दुसरंच घेऊन जायचं. सोनलवर त्यानं लिहीलेल्या कवितांची वही ट्रेन मध्ये हरवली तेव्हा हळहळलेला नीरव. अन् त्याहून त्रासदायक म्हणजे त्याच कविता वर्षभरात वेगवेगळया वृत्तपत्रात त्यानं वाचल्या कुणा दुसऱ्याच्याच नावानं.

बाहेरच्या जगात पडल्यावर झालेले जीवाभावाचे मोजून दोनच मित्र. एक अमेय.. दुसरा सागर. दोघेही नीरवहून वयाने मोठे. अमेय पाच वर्षांनी तर सागर तीन वर्षांनी. वयातलं अंतर बाजूला ठेवून मनं जुळली आणि हे तिघं एकत्र आले.

चार वर्षे एकमेकांचे ऑफिस सुटल्यानंतर रोजचे एक दोन तास एकमेकांच्या संगतीत घालवत. यादरम्यान नीरवने मुक्त विद्यापीठातून आपलं शिक्षण पूर्ण केलं.

तिघांमधली अतूट मैत्री बऱ्यापैकी बहरत चालली होती. शिवाय राहायलाही तिघे एकमेकांपासून पंधरा मिनिटांच्या अंतरावर होते. मग सुट्टीच्या दिवशीही एकमेकांकडे जाणेयेणे

व्हायचे. तिघांचेही विचार जवळपास सारखेच.. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जगायचे अन् नडेल त्याला मदतिचा हात द्यायचे. बाकी आपलं संध्याकाळचं मौजमस्ती करत घरी यायचं चक्र चालू होतं. मतभेद झालेच कधी तरी ते पाच मिनिटांच्या वर कधी टिकून नाही त्यांनी. तसा नियमच होता त्यांच्यात.

त्यांच्यात वयाने मोठा असलेला अमेय स्मार्ट आणि ॲक्टीव्ह होता. अमेय जे मनात तेच बाहेर अश्या स्वभावाचा होता. सागर लाजाळू आणि राहणीमान साधे ठेवून असायचा. जशी हुक्की येईल तसा सागरच्या स्वभावात बदल व्हायचा. नीरवच्या स्वभावातल्या वेगवेगळया छटा अमेयनं टिपल्या होत्या. आपल्याच विचारांत हरवलेल्या नीरवला त्यानं बऱ्याचदा पाहीलं होतं.

एक दिवस सायंकाळी गप्पा मारत असताना सागर म्हणाला.. “आपल्याला रविवारी एका ठिकाणी जायचं आहे.”

“कुणीकडे..” अमेयनं कुतूहलाने विचारले.

“अरे, माझं अवघड आहे, रविवारी मला घरी थांबणे गरजेचे आहे..” त्याला मध्येच तोडत नीरव म्हणाला.

“मला काही माहीत नाही यायचंय तर यायचंय… तुम्हांला वहीनी पसंत आली पाहीजे ना यार… मगच मी विचार करतो लग्नाचा..” सागर.

सागरच्या घरून त्याला मुलगी पाहण्यासाठी जायची कल्पना दिली होती. त्याचे वडील, काका आणि तो जाणार होते पण सागरला अमेय आणि नीरवचीही सोबत हवी होती. आपल्या वयाचं कुणीतरी तिथं हवं, तेवढाच आधार..

सागरच्या लग्नाचं ऐकताच नीरव आणि अमेय दोघं खुश झाले. “चला मग आजची पाणीपुरी सागरकडून..” नीरवनं घोषित केलं आणि अमेय चटकन उभा राहून तयार झाला. पाणीपुरी तीघांचीही जीव की प्राण… विषय निघताच तिघे पाणीपुरीच्या गाडीकडे निघाले.

हो नाही करता करता नीरवने कसंबसं सागरला आपल्या न येण्याबद्दल समजावलं. सागरही चेहरा पाडून तयार झाला. अमेय, सागर, त्याचे बाबा, काका रविवारचा कार्यक्रम आटोपून आले. चार-पाच दिवस या तिघांनाही फारसं भेटता आलं नव्हतं.

येणाऱ्या रविवारी सागरनं अमेय आणि नीरवला खास आमंत्रित केलं होतं बाहेर जेवणासाठी.. आणि स्पेशली आपल्या होणाऱ्या बायकोला भेटवण्यासाठी.

रविवारी एका जवळच्याच हॉटेलमध्ये दुपारी एकच्या सुमारास अमेय आणि सागर बसले होते. चेहऱ्यावरचा घाम पुसत नीरवनंही हॉटेलमध्ये प्रवेश केला. आल्याआल्याच पहिलं वॉशरूम गाठून ताजातवाना होऊन मित्रांशेजारी जाऊन बसला.

“काय कुठून आली स्वारी…” अमेयने विचारले.

“काही नाही रे.. सकाळपासून बाहेर कामं होती तीच संपवून आलोय.” नीरव थकलेल्या स्वरात म्हणाला.

“बस्स कर आता जरा.. किती पैसा छापतोय. माझं ठरलं आता बघा जमवून स्वतःचपण कुठंतरी.” सागर नीरवला छेडायला लागला.

“अरे गाढवांनो.. इथे तुमचा मोठा भाऊ राहीलाय बाजूला आणि तुम्ही आपल्याच लग्नाचं घोडं पळवताय..” अमेयच्या या कोटीवर तीघं मनापासून हसले.

“ते जाऊ दे पण सागर साल्या गेल्याच आठवड्यात मुलगी पाहीलीस ना.. लगेच बोलणीपण झालीत का रे.. भलताच स्पीड धरलायस तू तर..” नीरव.

“नीरव, तुला सांगतो मुलगी बघितली आणि आवडलीच यार एकदम.. ही माझ्यासाठीच बनली आहे असा साक्षात्कारच झाला ना यार. घरी येऊन बाबांना सांगितले आत्ताच्याआत्ता तिच्या घरी होकार कळवा. ते लोक पहिले इथेच राहायचे. सहा-सात वर्षापूर्वी मुख्य शहरापासून थोडे लांब राहायला गेले. चार दिवसांत तिकडूही ओके झालं. आणि हो (नीरवकडे पाहत) उपकार झाले तुमचे की तुम्ही नाही आलात.. (अमेयकडे वळून) काय अम्या..?

नाहीतर माहीत पडले तिनं तुलाच पसंद केलं…" सागरनं अजून एक पंच मारला, अमेय आणि सागर पुन्हा खिदळायला लागले.

का? कुणास ठावूक? नीरव यावेळी हसला नाही.

"अरे पण वहीनी आहेत कुठे..? आपल्याला येऊन अर्धा तास झालाय.." अमेयने विचायलं.

"तिला मीच अर्धा तास उशिरा बोलावलंय रे.. आपल्याला थोडं बोलायला भेटावं म्हणून.. " सागर डोळा मारत म्हणाला.

"हो, नाहीतरी आता आपल्याला कुठे रोज नीट बोलायला भेटणार म्हणा.. तुला लग्नानंतर घर सुटणारच नाही ना.. " नीरव.

"एकदम करेक्ट…, तुला सांगतो नीर्‍या.. त्या दिवशी नजर हटत नव्हती सायबांची वहीनीवरून.. टकामका बघत होता नुसता.." अमेयनेही हसत नीरवला साथ दिली.

“बस काय भावा..” लाजलेल्या सागरनं तोंड जरासं वाकडंच केलं. अन् पुढच्याच क्षणाला त्याच्या चेहऱ्यावर हसु उमटलं. “वहीनी आली तुमची भावांनो..” त्यानं दबक्या आवाजातच नीरव आणि अमेयला सांगितलं.

ती आली.. सागर तिला सामोराच बसला होता.. त्यानं हात करून तिला खुणावलं. नीरव आणि अमेय तिला पाठमोरे होते. सागरनं उभं राहून तिच्यासाठी असलेली चेअर थोडी मागे केली. सागरकडे पाहत ती चेअरजवळ आली तसं सागरने चेअर हलके पुश करत तिला बसण्यास सुलभ केलं.

“मेड फ़ॉर इच ऑदर...” अमेय पुटपुटला.. तसं नीरवची नजर वर झाली नेमके अमेयला स्मितहास्य देऊन तिची नजर नीरवकडे वळली...

दोघं एकमेकांना पाहत अवाक् झाले.

“फ्रेंडस्... मीट मेघना.. आणि मेघना हा अमेय आणि हा नीरव.. सागरनं ओळख करून दिली.

‘मेघना... तीच ती शाळेतली....’

## शेवट...

त्या दिवशी हॉटलमध्ये नीरवला पाहून मेघना खरंतर एक क्षण हरखून गेली होती.. पण दुसऱ्याच क्षणी तिला जाणीव झाली की त्यांची भेटण्याची वेळ चुकली होती.

कसंबसं सागर आणि अमेयसमोर बोलताना त्या दोघांनी अगदी अनोळखीपणाच दाखवला. शाळेतलं प्रेम अश्याप्रकारे समोर आल्यानं मेघनाला काही सुचेनासं झालं होतं. त्यात सागरला अगोदरच दिलेल्या होकाराचा आता तिला पश्चात्ताप होत होता. पण ती तरी काय करू शकणार होती.. झाल्या प्रकारात तिची काहीच चुक नव्हती. आणि पुजा-नीरवचं काय झाले असेल हे पण तिला जाणून घ्यायचे होते.

नीरवच्या मनाची अवस्था तर त्याहूनही वाईट होती. जे प्रसंग विसरण्याच्या प्रयत्नात तो होता.. तेच आज पुन्हा मेघनाच्या रूपाने समोर आले. आणि जर आता ती सुबोधसोबत नाहीच आहे तर काय अर्थ होता शाळेतल्या त्यागाचा.. सुबोध आणि मेघनामध्ये नेमकं झालं तरी काय.. आणि आज अचानक सागरसोबत लग्न... नीरवचं मन खायला उठत होतं.. या असल्या बऱ्याच सवालांनी...

एव्हाना हॉटेलमध्ये अमेयने वातावरण बरंच खेळकर बनवलं होतं. सागरही मेघना सोबत असल्याने खुश होता. नीरव आणि मेघनाच्या चेहऱ्यावरही थोडंफार हास्य होतं. पण ते

हास्य कुठेतरी बनावटी आहे याची कल्पना अमेयला आली होती. त्या दोघांना पहिल्यांदाच एकमेकांकडे पाहताना अमेयने पाहीलं होतं. त्यांच्या चेहऱ्यावरचे बदललेले भाव नक्कीच कोड्यात टाकणार होते..

लंचनंतर हॉटेलमधून बाहेर पडताना मेघनानेच पुढाकार घेतला आणि सागरला म्हणाली.. “मी अमेय आणि नीरवचा नंबर घेतला तर काही हरकत नाही ना..?

“अगं.. यात हरकत असण्यासारखे काय आहे.. उद्या आपल्यात भांडण होऊन मी घरातून बाहेर पडलो तर या दोघांशिवाय कुठे जाणार नाही…” सागरनं हसतच उत्तर दिले.

अमेयनेही सागरच्या हसण्यात साथ दिली. आणि नीरवनं मनातच मेघनाच्या चतुराईचं कौतुक केलं. नंबर शेअर करून झाल्यावर नीरव आणि अमेय त्यांचा निरोप घेऊन घरी निघाले. सागरही मेघनाला सोडायला गेला.

अमेय आणि नीरव रस्त्यावर चालत होते. नीरव आपल्या तंद्रीत हरवला होता. अमेय त्याचंच निरीक्षण करत होता. नीरवला सहज म्हणून विचारले तर तो सरळ सांगणार नाही याची अमेयला खात्री होती. म्हणूनच त्यानं रोखठोक विचारलं… “मेघनाला तू यापूर्वीही भेटला आहेस ना…?

नीरवनं एक कटाक्ष अमेयवर टाकला. पण काहीच प्रतिक्रिया दिली नाही. अमेयनं पुन्हा जोर दिला.. "कधीतरी मोकळं कर तुझं मन.. आपल्या मैत्रीची काहीच किंमत नाही का तुला..?

अमेयच्या या वाक्याने शेवटी नीरवला बोलतं केलं. मेघनासोबतच्या आपल्या शाळेतल्या आठवणी त्यानं अमेयपुढं स्तब्धतेने मांडल्या.

"त्यानंतर मी विसरून गेलो सर्व.. आता आयुष्य फक्त शांततेत व्यतीत करायचं ठरवलं आहे. कोणी सोडून गेल्याचा त्रास नाही करून घ्यायचा मला कधी.." नीरव.

अमेयला नीरवबद्दल वाईट वाटत होतं पण करण्यासारखं काहीच नव्हतं. त्यात सागरने मेघनाविषयीच्या भावना आधीच मांडल्या असल्याकारणाने त्याच्याशीही काही बोलता येण्यासारखं नव्हतं.

पुढे काहीच न बोलता चालत ते दोघं अमेयच्या घराकडे पोहोचले. तिथून अमेयचा निरोप घेऊन नीरवही घरी जायला निघाला. पण मन मानायला तयार नव्हतं आपसुकच तो शाळेच्या पटांगणाजवळच आला. पायऱ्यांवर नेहमीच्याच जागी बसला.

शाळेतले प्रसंग आठवून त्याला हसायला येऊ लागले. सुबोधशी मैत्री, गीताने मेघनाची केलेली वकीली, लव्हगुरू पुजा… मेघना.. नकळत त्याच्या गालावर खळी उमटली.. आणि सोनल

... गालावरची खळी नाहीशी झाली.. त्या खळीमुळे पडलेल्या सुरकुत्यांवरनं आसवं घरंगळत खाली टपकू लागली... सुकलेल्या ओठांवर त्या आसवांच्या येण्यानं जगण्यातलं खारटपण नीरवला जाणवलं.

मनात नसतानाही अश्रू पुसले.. उठला आणि घरी जायला निघाला.

दोन दिवसांनी मेघनाचा फोन आला.. "नीरव संध्याकाळी भेटायला येशील..?.

नीरवला अपेक्षा होतीच या फोनची. त्याला काही गोष्टींचा ताळमेळ लागत नव्हता. आणि या सर्वाची उकल होण्यासाठी मेघनाला भेटणं गरजेचे होतं.

"हो..., तुझ्याइथली जागा सांग मी येतो तिथे.." नीरव उत्तरला.

खुश होऊन मेघनानं त्याला पत्ता सांगितला. ठरल्याप्रमाणे ऑफिसनंतर नीरव मेघनाने दिलेल्या पत्त्यानुसार एका हॉटेलमध्ये बसला होता. काही वेळातच मेघना आली.

कॉफीची ऑर्डर देऊन झाल्यावर दोघे एकमेकांशी थोडे सहज होऊन बोलू लागले.

"कसा आहेस..? लग्न केलेस का..?" मेघना.

“ठीक.., आणि सागरने सांगितले नाही का माझं लग्न नाही झालं ते..? नीरवने हसूनच उत्तर दिले. पण तिचा चेहरा मात्र सागरचं नाव ऐकून पडला.

थोडं थांबूनच तिने विचारलं..”पुजाचं काय झालं..?”

नीरवच्या मनात आलं की इतक्या वर्षांनी सांगून टाकावं आता मेघनाला की ते फक्त नाटक होतं. पण त्यानं मेघनालाच प्रतिप्रश्न केला.. “तुझं आणि सुबोधचं का नाही जमलं.. कधी ब्रेक अप झालं तुमचं.?

मेघनाने एक सुस्कारा सोडला..

“आमचं ब्रेक अप होण्यासाठी अगोदर प्रेम जुळायला तर हवं होतं.” मेघना किंचीत हसत पुढे बोलू लागली.. “मी नाटक केलं होतं तेव्हा पुजाने तुला हो म्हणावं म्हणून… नंतर सुबोधलाही त्या नाटकात सामील करून घेतलं होतं… आम्ही फक्त तुमच्यासमोर एकत्र असल्याचा आव आणत होतो… आमच्यात प्रेम वगैरे काही नव्हतं…” मेघनानं स्पष्टीकरण केलं.

ते ऐकत असतानाच नीरवचे डोळे आश्चर्याने विस्फारले. तिचं बोलणं पूर्ण होईपर्यंत तो फक्त आ वासून तिला पाहत होता. शेवटी मेघनानेच त्याला भानावर आणले.

"बोल काहीतरी, पुजा का सोडून गेली..?" मेघनानं पुन्हा विचारले..

त्याला बोलायचं होतं की, 'तिच्या मनात सुबोधविषयीची प्रेमभावना जागृत झाल्याची पाहून त्यानंही फक्त एक डाव खेळला होता. पण त्याला नुकतंच कळलं होतं की तो डाव तेव्हा त्याच्यावरच उलटला होता. त्या दोघांना परिस्थितीने आता आयुष्यात एका वेगळयाच टप्प्यावर आणून ठेवले होते. एकीकडे सागर होता ज्याच्याशी मेघनाचं लग्न ठरलेले. दुसरीकडे शाळेतली मैत्रीण, तिच्यावरचं पहिलं प्रेम...

"काही नाही गं थोडे मतभेद झाले.." मेघनापासून नजर फिरवत नीरव उत्तरला.

"आणि त्यानंतर... कुणी आली असेल ना इतक्या वर्षांत..." मेघनाने माहीती काढण्याचा प्रयत्न केला.

"नाही.. मला तितकासा वेळच नाही भेटला.." नीरवने यावेळी खरं सांगितले.

"काय....? तू इतकी वर्षे... एकटा..." मेघनाच्या चेहऱ्यावरचं गांभीर्य स्पष्ट दिसू लागलं होतं. "एकदा तरी मला भेटायचा प्रयत्न केला असतास.. आपण मित्र होतो एकमेकांचे.. तू तर शाळा संपल्यावर एकदाही तोंड दाखवले नाहीस... नीरव.. कम ऑन यार..." मेघना आता जरा मोकळं होऊनच बोलू लागली.

“अगं.. खरंच वेळ नाही भेटला.. कुणाचाच विचार नाही आला.. घरची जबाबदारी होती..मग मला इतर कोणत्याही गोष्टीत लक्ष घालून चालणार नव्हतं.” नीरव अगदी काकूळतिला येऊन सांगू लागला.

पाच मिनिटं शांततेत गेली..

मेघनाच्या डोळयांतून अश्रू वाहू लागले… “फक्त एकदा नीरव.. एकदा भेटून बोलला असतास.. मला विचारलं असतंस… एकदा प्रयत्न केला असतास.. मला शोधण्याचा.. तुझ्यासाठी कितीही वर्षे थांबायची तयारी होती माझी.. माझं पहिलं प्रेम आहेस तू…” मेघनाने मनात दाटलेल्या सगळया भावनांना रडतच मोकळी वाट करून दिली.

तिला सावरण्यासाठी त्याचे हात साहजिकच सरसावले… पण तिच्यापर्यंत पोहचू शकले नाहीत.. काय वल्गना आहे ही प्रेमाची…

‘मी सोनलचा असूनही.. तिचा नाही होऊ शकलो.. आणि मेघनाचा नसूनही कायम तिचा राहीलो… मी ठरवलं असतं तर सगळं बदललं असतं.. पण मी खरंच चुकीच्या हेतूने यातलं काही घडवून नव्हतं आणलं. नियतीने मला हतबल केलं.. तेव्हाही… आणि आजही.. नेहमीच..’ नीरवचं अंतर्मन यावेळी रडू लागलं.

स्वतःचे भाव लपवत नीरव बोलू लागला.. “मेघना.. माझ्या मनात कधी तुझ्याबद्दल तसा विचार नाही आला.. मला माफ कर. मी फक्त तुझा मित्रच आहे…”

नीरवचे शब्द ऐकून मेघनाला अश्रू आवरणं अवघड झाले. तिच्या हुंदक्याचा आवाज नीरवच्या काळजावर घाव देऊन गेला. ती अक्षरशः घाईतच उठली अन् निघून गेली.

नीरवने तिला थांबवण्याचा प्रयत्न नाही केला.. ती गेली अन् तीची पाठमोरी आकृती तो नजरेत सामावून ठेवत होता…

पुन्हा ते कधीच भेटले नाहीत. सागरच्या विनंतीवरही नीरव कधी त्यांच्यासोबत बाहेर भेटला नाही. काही महीन्यातच सागर आणि मेघनाचे लग्न ठरले.

आज लग्न झाल्यावर वरातीमध्ये नीरवने आयुष्यातले सगळे तणाव बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. रात्री अमेयच्या घरी झोपताना बाहेरचा मोठा होत गेलेला चंद्र पुन्हा आपल्या मूळ रूपात येऊ लागला होता… आणि थकलेल्या नीरवच्या डोळयांत आसवं जमा होऊ लागली होती …

**सहा महीन्यांनंतर....**

“आणि साहीत्य संमेलनातील उत्कृष्ट लेखकाचा पुरस्कार जात आहे....... "

प्रमुख पाहुण्यांनी थोडा पॉज घेतला. इकडे याच्या मनात चलबिचल सुरू झाली. डोळे बंद, श्वास रोखलेला अन हातांची बोट एकमेकांत गुंफलेली नव्हे नाव ऐकण्यासाठी होत असलेल्या विलंबामूळे अधिकच ताण देऊन गुरफटलेली.

“चिन्मय ऊतेकर.... अभिनंदन” प्रमुख पाहुणे.

त्याच्या बाजूच्याच खुर्चीत हालचाल झाली अन् चिन्मय नावाची व्यक्ती आपला पुरस्कार घेण्यासाठी पुढे गेली. याच्या खुर्चीवर दोन एक क्षण निराशा पसरली. पण चिन्मयने पुरस्कार स्विकारताच याच्या गुरफटलेल्या हातांनी खिलाडूवृत्तीने टाळया वाजवल्या. पुरस्कार सोहळा संपताच हा तिथून बाहेर पडला.

घरी पोहोचेपर्यंत याच्या डोक्यात स्पर्धेसाठी पाठवलेली कथा होती. ही कथा लिहीण्यासाठी कुठेकुठे फिरला होता तो, किती धडपड केली होती. कितीतरी निरनिराळया स्वभावाच्या माणसांशी प्रत्यक्ष आणि कॉलवर बोलणे केले होते या सर्व खटाटोपी फक्त त्यालाच

माहीत होत्या. कथा लिहील्यावरही पन्नासदा ती वाचून, त्यात हवे तसे बदल करून घेतले होते. तरीही आज आपल्याला पुरस्कार मिळाला नाही याच विवंचनेत तो घरी येऊन झोपी गेला.

दूसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुन्हा तो स्पर्धा आयोजकांकडे गेला. कालच्या पुरस्कार विजेत्या कथेची एक कॉपी वाचायला म्हणून घेतली. साधारण वीस मिनिटात त्याची कथा वाचून संपली. घेतलेली कॉपी पुन्हा जमा करून तो निघाला. बाहेर नाक्यावरच्या टपरीवर चहा घ्यायच्या विचाराने थांबला. चहाचे घोट घेत पुरस्कार विजेत्या लेखकाची कथा आठवायला लागला. "खरंच त्याचे लिखाण माझ्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक चांगले आहे." "कुठेतरी मीच कमी पडलो वा माझे प्रयत्न अपूरे होते." "माझ्या कथेत स्पष्ट सरळ भाषा होती, त्याच्या लिखाणात अलंकारिक भाषेचा प्रभाव होता. "

मन खट्टू तर झालेलंच त्याचं. पण उमेद हरला नव्हता तो...

नीरवच्या आयुष्यात असे प्रसंग शंभरपैकी शंभरवेळा त्याच्यासोबत घडले होते. अन् तो त्या प्रत्येक प्रसंगातील मिळालेल्या अनुभवातून नवीन काहीतरी शिकण्याची जिद्द बाळगणारा ...

निश्चल..

स्थितप्रज्ञ..

'शापित राजपूत्र...'

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

**एक प्रसन्न अनुभव**